# SUK RESEARCH AND DEVELOPMENT FOUNDATION

(a Section 8 Company of Shivaji University)

**Registered Office: B3, Shivaji University Campus, Vidyanagar, E Ward, Kolhapur-416004, Maharashtra, India**

CIN: U85300PN2021NPL203774

**Phone:** 0231-2609440; **E-MAIL:** sukrdf@unishivaji.ac.in; **http://www.unishivaji.ac.in/sciil/**


Ref. No. SUKRDF/2023-24/ Date: 01/02/2024

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,

मा. अधिविभाग प्रमुख/संचालक/समन्वयक,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात येणा—या "IDEATHON" या उपक्रमाबाबत.**

महोदय,

शिवाजी विद्यापीठाच्या एसयुके रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट फौंडेशन या इनक्युबेशन सेंटर व युआयआयसी आणि आयआयसी, तंत्रज्ञान विभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ मार्च, २०२४ रोजी शिवाजी विद्यापीठात सकाळी १० ते ५ या वेळेत **"IDEATHON"** या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या उपक्रमामध्ये सहभागी स्पर्धक हे विविध विषयांवरील संशोधन समस्यांचे निराकरण करण्याच्यादृष्टीने कार्य करून त्यावर नाविण्यपूर्ण संकल्पना सादर करतील. यासाठी त्यांना तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन देण्यात येणार आहे. तसेच नवसंकल्पना मान्य झाल्यास इनक्युबेशन सेंटरमध्ये इनक्युबेशनची संधी मिळणार आहे. सादर केलेल्या संकल्पनांमधील विषयानिहाय प्रत्येकी ३ क्रमांक काढण्यात येतील. विजेत्या स्पर्धकांना अनुक्रमे प्रथम क्रमांक रूपये ५,०००/—, द्वितीय क्रमांक रूपये ३,०००/— व तृतीय क्रमांक रूपये २,०००/— असे रोख रक्कम स्वरूपात बक्षीस देण्यात येणार आहे.

तरी, **"IDEATHON"** या उपक्रमामध्ये जास्तीतजास्त स्पर्धक सहभागी होण्यासाठी आपल्याकडून संशोधक विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात यावे ही विनंती. सोबत, या उपक्रमाचे पत्रक आपल्या संदर्भासाठी जोडले आहे. सदरचे पत्रक आपल्या कार्यालयाच्या/महाविद्यालयाच्या/ अधिविभागाच्या सूचना फलकावर प्रदर्शीत करण्यात यावे.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

1/2/24

प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत
सीईओ, एसयुकेआरडीएफ

SUK Research & Development Foundation *

सोबत— **"IDEATHON"** या उपक्रमाचे पत्रक.

Scanned with OKEN Scanner